**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुधवारपासून पोलंड आणि युक्रेनच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर
- कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी उद्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी
- लाच आणि भ्रष्टाचार प्रकरणी मध्य प्रदेशातल्या सिंगरौली इथल्या नॉर्दर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या व्यवस्थापकासह चौघांना सीबीआयकडून अटक

**आणि**

- माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुधवारी पोलंड आणि युक्रेनच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. भारताचे प्रधानमंत्री ४५ वर्षांनंतर पोलंडला भेट देणार आहेत, त्यामुळे ही भेट ऐतिहासिक असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाच्या पश्चिम विभागाचे सचिव तन्मय लाल यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना दिली. उभय देशांमधील राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत असल्यानं त्याचं महत्त्व असल्याचंही लाला यांनी सांगितलं.

पोलंडची राजधानी वारसॉ इथं प्रधानमंत्र्यांचं औपचारिक स्वागत झाल्यानंतर ते  प्रधामंत्री डोनाल्ड टस्क आणि राष्ट्राध्यक्ष आंद्रेज डुडा यांची भेट घेतील. त्यानंतर प्रधानमंत्री वारसॉ इथल्या भारतीय नागरिकांशी, उद्योजकांशी, नेत्यांशी संवाद साधतील. गुजरातमधील जामनगर आणि महाराष्ट्रातील कोल्हापूरशी पोलंड देशाचं खास नातं आहे. यावर आधारीत असलेल्या स्मारकांनाही प्रधानमंत्री भेट देणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २३ तारखेला युक्रेनला जाणार आहे. युक्रेनचे राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेंस्की यांनी त्यांना निमंत्रीत केल्याची माहिती लाल यांनी दिली.

**<><><><><>**

कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाची दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली असून उद्या त्यावर सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी होणार असून, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा हे या पीठाचे सदस्य आहेत.

कोलकात्यातल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतः लक्ष घालावं, अशी विनंती करणारं पत्र देशातल्या ७० हून अधिक पद्म पुरस्कारप्राप्त डॉक्टरांनी लिहलं आहे. अशा हिंसक कृती वैद्यकीय व्यवसायाचा पाया हादरवणाऱ्या असून महिला आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्यांविरोधात होणाऱ्या हिंसाचाराकडे तातडीनं लक्ष पुरवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. पुन्हा पुन्हा घडणाऱ्या अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी डॉक्टरांनी या पत्राद्वारे केली.

**<><><><><>**

कोलकाता इथं महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्रातल्या निवासी डॉक्टरांचा बेमुदत संप सातव्या दिवशीही सुरूच आहे. या संपकाळात मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात १५ रुग्णांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे.

सर्व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयं ‘सुरक्षित झोन’ घोषित करावीत आणि केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायदा लागू करावा, या मागणीवर

निवासी डॉक्टर ठाम आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत; तोपर्यंत मागं हटणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

नागपूरच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आणि मॉरिशस सरकार यांच्यात आज मुंबईत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. मॉरिशसचे केंद्रीय मंत्री ॲलन गानू आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या.

या करारानुसार मॉरिशसमधील कर्करोग रुग्णांना नागपुरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आंतरराष्ट्रीय दर्जाची वैद्यकीय सेवा दिली जाईल. तसंच तिथल्या रुग्णालयांमधल्या आरोग्य कर्मचारी, परिचारिकांना प्रशिक्षणाची जबाबदारी या इन्स्टिट्युटला दिली आहे. या करारामुळे महाराष्ट्र आणि मॉरिशसचे संबंध अधिक सुदृढ होतील, असं ॲलन गानू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि नेपाळच्या परराष्ट्र मंत्री आरजू राणा देऊबा यांची आज नवी दिल्लीत भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांनी ऊर्जा, व्यापार, दळणवळण आणि पायाभूत सुविधांचा विकास या मुद्द्यांवर चर्चा केली.

नेपाळ भारताला सुमारे एक हजार मेगवॉट वीज निर्यात करणार असल्याबद्दल डॉ. एस. जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये आनंद व्यक्त केला आहे. दोन्ही देशांतले सांस्कृतिक बंध आणि भारताची शेजारधर्माच्या नीतीमुळे हे संबंध अधिक दृढ होत असल्याचंही जयशंकर यांनी म्हटलं आहे. नेपाळच्या परराष्ट्रमंत्री आरजू राणा देऊबा या पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कामगिरीचा आढावा आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत घेतला. या बैठकीत बँकांच्या ठेवींमधली वाढ, कर्ज-ठेवी गुणोत्तर आणि मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली वाढ यांचं मूल्यमापन करण्यात आलं. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम सूर्य घर आणि प्रधानमंत्री विश्व कर्मा योजनांचाही आढावा अर्थमंत्र्यांनी घेतला.

<><><><><>

तेलंगणातील काँग्रेस नेते अभिषेक मनु सिंघवी यांनी आज राज्यसभेच्या पोट निवडणुकीकरता उमेदवारी अर्ज दाखल केला. या प्रसंगी तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवनाथ रेड्डीही त्यांच्या समवेत उपस्थित होते.

<><><><><>

मलेशियाचे प्रधानमंत्री दातोसेरी अन्वर भारताच्या तीन दिवसीय दौऱ्यावर येणार असून आज रात्री ते नवी दिल्लीत पोचणार आहेत. मलेशियाचे प्रधानमंत्री या नात्यानं त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असणार आहे. उद्या ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचीही भेट घेणार आहेत.

<><><><><>

लाच आणि भ्रष्टाचार प्रकरणी सीबीआयनं मध्य प्रदेशातल्या सिंगरौली इथल्या नॉर्दर्न कोलफिल्ड्स लिमिटेड- NCL च्या व्यवस्थापकासह चौघाजणांना अटक केली. व्यवस्थापकाच्या घराची झडती घेतली असता, सुमारे चार कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त केली. NCL साठी काम करणारे ठेकेदार आणि अधिकाऱ्यांकडून ही रक्कम व्यवस्थापकानं लाच म्हणून घेतल्याची माहिती सीबीआयनं दिली.

सीबीआयनं अटक झालेल्या आरोपींपैकी एकजण मध्य प्रदेशात फार्म चालवतो, तसंच तो विविध कंत्राटदार,व्यापारी आणि NCL च्या अनेक अधिकाऱ्यांसाठी लाच घेण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करायचा, अशी माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली. सीबीआय पथकानं सिंगरौली, जबलपूर आणि नोएडा इथं अनेक ठिकाणी तपास केला. त्यावेळी तिथून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, डिजीटल डिव्हाइस आणि अनेक आक्षेपार्ह कागदपत्र हस्तगत केली आहेत.

**<><><><><>**

माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं आज चेन्नईत निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. देहरादूनचं राष्ट्रीय भारतीय लष्करी महाविद्यालय आणि पुण्याजवळ खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत त्यांचं शिक्षण झालं होतं. त्यांनी अनेक महत्वपूर्ण आघाड्यांवर सैन्याचं नेतृत्व केलं होतं तसंच अनेक युद्धांमध्ये कामगिरी केली होती. पद्मनाभन यांनी काही पुस्तकांचही लिखाण केलं होतं.

**<><><><><>**

जम्मू कश्मिरमधे उधमपूर जिल्ह्यात, आज केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या गस्ती पथकावर दहशवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात एक पोलीस निरीक्षक शहीद झाला. रामनगर तालुक्यातल्या चील भागात हे पथक गस्त घालत असताना दहशतवाद्यांनी त्यांच्यावर बेछूट गोळीबार केला. गोळ्यांच्या ३० ते ४० फैरी त्यांनी या पथकावर झाडल्या. या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी या परिसराला वेढा घातला असून, शोधमोहिम सुरु आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात रक्षाबंधनाचा सण उत्साहानं साजरा होत आहे. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या विविध रंग आणि आकाराच्या राख्यांबरोबरच सामाजिक

सद्भावनेचा, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या राख्याही वापरल्या जात आहेत. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांनी आज रक्षाबंधनाचे कार्यक्रम आयोजित केले.

रक्षाबंधनानिमिमत्त विविध सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक संस्थांच्या प्रतिनिधींनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेऊन त्यांना राखी बांधली. यावेळी राज्यपालांनी सर्वांना रक्षा बंधनाच्या शुभेच्छा दिल्या. **पालघर** जिल्ह्यातल्या 'सेवा विवेक' ग्राम विकास केंद्रामधल्या, आदिवासी महिला कारागिरांनी राज्यपालांना बांबूपासून तयार केलेली पर्यावरण स्नेही राखी बांधली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधली.

रक्षाबंधनानिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज शालेय विद्यार्थ्यांनी राख्या बांधल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज नारळी पौर्णिमा उत्साहानं साजरी होत आहे. कोळी बांधवांसाठी आपल्या मासेमारीचा नवा हंगाम सुरु करण्याचा हा दिवस. पावसाळ्यात खवळलेल्या समुद्राला शांत होण्याची प्रार्थना करुन आणि नारळ अर्पण करुन होड्या समुद्रात लोटण्याची प्रथा आहे. या निमित्तानं किनारपट्टीवरच्या कोळी वसाहतींमधे विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**<><><><><>**

आज रक्षाबंधन हा सणाचं उत्साही वातावरण आहे तर दुसरीकडे या वर्षातली महत्त्वाची खगोलीय घटना घडणार आहे. ही घटना म्हणजे ब्ल्यू सुपर मून. संध्याकाळी ६ वाजून ५४ मिनिटांपासून पुढचे दोन दिवस साध्या डोळ्यांनी हा सुपर ब्ल्यू मून बघता येणार आहे.

ब्ल्यू सुपर मूनच्या दिवशी चंद्र हा नेहमी पौर्णिमेला उगवणाऱ्या चंद्रापेक्षा अधिक मोठा दिसणार आहे. चंद्र पृथ्वीच्या अधिक जवळ येणार असल्यानं त्याचा प्रकाश नेहमीपेक्षा ३० टक्क्यांहून अधिक प्रखर आणि आकारही १४ टक्क्यांहून अधिक असणार आहे. ही घटना अत्यंत दुर्मिळ समजली जात असल्यानं खगोलप्रेमी आणि अभ्यासकांत मोठी उत्सुकता आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेऊ देत नसल्याचा मनोज जरांगे पाटील यांचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी फेटाळला आहे. मराठा समाजासाठी आजपर्यंत जे काही निर्णय झाले ते एक तर मी केले, किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले आहेत. मात्र, मनोज जरांगे पाटील हे जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करत असल्याचं फडनवीस यांनी म्हटलं आहे. जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना याबाबत विचारावं, मराठा आरक्षणाकरिता कुठलाही निर्णय घ्यायचा त्यांनी प्रयत्न केला आणि तो थांबवला, असं त्यांनी सांगितलं तर त्या क्षणी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून देखील निवृत्त होईन, असं फडनवीस म्हणाले.

दरम्यान फडनवीस यांच्यावरचे आरोप चुकीचे आणि तथ्यहीन असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे.

**//<><><><><>//**